Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidiciplinary international E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

18th Feb. 2019 Special Issue- 130 ( II )

# THE ROLE OF GOVERNMENT TO PROTECT THE HUMAN RIGHTS

**Chief Editor**
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

**Executive Editor of This Issue**
Dr. Vanmala Govindrao Gundre
Principal
Yashwantrao Chavan College, Ambajogai. Dist. Beed.

**Co-Editor**
Dr. Ahilya Barure
Dr. D.R. Tandale
Dr. D.B. Tanduljekar

# Index


1. मानवाधिकार आणि मागासवर्गिय वर्ग — 13
   **प्रा. कांबळे दिलीप बबनराव**
2. भारतातील मानवी अधिकार आणि सामाजिक लोकशाहीची यशस्वीता — 15
   **प्रा. सोनवळकर रमेश शंकरराव**
3. मानवी हक्क आणि पोलिस प्रशासन — 20
   **डॉ. संभाजी कोंडबाजी फोले**
4. मानवी हक्क आणि स्त्री — 23
   **गडलवाड सुप्रिया गणपतराव**
5. आदिवासी जमाती व मानवी हक्क — 25
   **प्रा. डॉ. संजय सुरेवाड**
6. मानवी हक्क आणि सिमांत शेतकरी — 27
   **प्रा. गोविद रामराव काळे**
7. मानवाधिकाराचे प्रकार — 29
   **डॉ.ज्ञानेश्वर सोनवणे**
8. मानवी हक्क : संकल्पना आणि आवश्यकता — 31
   **प्रा. पवार मनोरमा श्रीधर**
9. भारतीय राज्यघटनेतील मानवी हक्क — 33
   **ज्योती श्रीपती जोगदंड (वैद्य) , डॉ. वनमाला गुंडरे**
10. शाररिक शिक्षण व मानवी हक्क — 37
    **प्रा.भारत विठ्ठलराव पल्लेवाड**
11. भारतीय संविधान और मानव अधिकार — 39
    **प्रा.डॉ.भारती नकुलराव कांबळे**
12. मानव अधिकार आणि दहशतवाद — 42
    **महेशकुमार चौरे**
13. मानवी हक्क आणि महिला — 44
    **प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे , डॉ. महादेव गव्हाणे**
14. भारतीय अर्थव्यवस्था : रोजगार हक्काची घटनात्मक स्थिती आणि वास्तव — 47
    **डॉ. डी. बी. तांदुळजेकर**
15. मानवी हक्कांच्या संरक्षणात प्रसारमाध्यमे व स्वयंसेवी संस्थांची भूमिका — 50
    **प्रा. डॉ. अप्पाराव चंद्रराव गायकवाड , प्रा.डॉ.आदमाने भाऊसाहेब बंकट**
16. मानवी हक्क आणि महिला — 56
    **डॉ.महादेवी वैजनाथ फड, कावळे एस.टी.**
17. भारतीय अर्थव्यवस्था व मानवाधिकार — 58
    **प्रा. घुटे बालाजी तुळशीराम**

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 130 (II) | Feb. 2019 | UGC Approved No. 40705
The Role of Government to protect the Human Rights

# मानवी हक्क आणि महिला

**प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे**
पदवी व पदव्युत्तर, राज्यशास्त्र विभाग
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

**डॉ. महादेव गव्हाणे**
प्राचार्य
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

---

**प्रस्तावना :**

मानवी अधिकाराची संकल्पना आज व्यापक अर्थाने वापरली जात आहे. व्याक्तीचा सर्वांगीन विकास साधण्यासाठी मुलभूत हक्कांची गरज असते. जगातील प्रत्येक समाजात मानवी हक्काची संकल्पना आढळून येत असल्याने या संकल्पनेचे स्वरूप दिवसेंदिवस व्यापक बनत चालले आहे. कोणत्याही समाजाला समृध्द व सशक्त ठेवण्यासाठी त्या समाजातील प्रत्येक वर्गाला सबल होण्यासाठी समान संधी देणे आवश्यक असते. कारण सबलता ही विकासाच्या समान संधीतुन निर्माण होत असते. परंतु ज्या ठिकाणी भेदभाव केला जातो. तो समाज अशी सशक्तता व सबलता निर्माण करण्यास असमर्थ ठरतो. भारतीय समाजात तर स्त्रीयांना अनेक हक्कांपासून वंचित ठेवण्यात आले आहे. स्त्री ही पुरूषाच्या मार्गातील अडसर आहे. अशा दृष्टीकोणातून स्त्रीकडे पाहिले जाते. आजही स्त्री-पुरूषांमध्ये विषमता आढळून येते, स्त्रीयांना पुरूषांच्या बरोबर अधिकार नसतात पण मानवी जीवनाच्या प्राथमिक अवस्थेत म्हणजेच निसर्गावस्थेत पुरूष व स्त्री समान स्वरूपात आपले जीवन जगत होते. सामाजिक करारवादी विचारवंत थॉमस हॉब्ज यांनी आपल्या 'Leviathan' या ग्रंथात स्पष्ट केलेली निसर्गावस्था किंवा जॉन लॉक यांनी आपल्या 'Two Treaties on Civil government' या ग्रंथात आणि रूसो यांनी आपल्या 'Social Contract' या ग्रंथात सामाजिक करार होण्यापुर्वी जी निसर्गावस्था स्पष्ट केली आहे. त्यात कोठेही स्त्री-पुरूष यांच्यात लिंग-भेद होता असे म्हटले नाही. यावरून निसर्गावस्थेत स्त्री-पुरूष यांच्यात भेद केला जात नव्हता. जॉन लॉक याने तर म्हटले आहे की, सर्व मनुष्यांना जीविताचा, संपत्तीचा व स्वातंत्र्याचा समान हक्क होता आणि निसर्गावस्थेत मानव हा इतर मानवांच्या हक्कांवर आक्रमण करत नव्हता. यावरून हे स्पष्ट होते की, स्त्री व पुरूषांना समान स्वातंत्र्याची प्राप्ती निसर्गावस्थेत होत असे. पण रूसोने म्हटल्याप्रमाणे 'मनुष्य हा जन्मतःच स्वतंत्र व समान आहे. पण सर्वत्र तो बंधनात बंदिस्त झाला.' ही बंधने मानवाला अनेक सामाजिक संस्थांनी आणि सामाजिक नियमांनी बहाल केली. रूसो च्या वरील विधानावरून असे म्हणता येते की, मुलतः मानव म्हणुन सर्वांचे स्वातंत्र्य अबाधित व अहस्तक्षेपीय होते मात्र मानवा-मानवात भेद करत आणि त्यावर अनेक निर्बंध लादत त्याला गुलाम बनविले गेले. स्त्रीयांनाही गुलाम म्हणूनच वाईट वागणूक देण्यात आली. निसर्गावस्थेतील समता आणि स्वातंत्र्याची सर्वांना मिळालेली हमी कालानुरूप लोप पावत गेली. स्त्री-पुरूषांत भेदभाव करून स्त्रियांच्या नैसर्गीक अधिकारांची पायमल्ली करण्याचे अनेक प्रयत्न केले गेले.

**प्राचीन व मध्ययुगीन कालखंडातील स्त्रीयांची स्थिती :**

ज्या समाजात स्त्रीयांना समानतेचा, सन्मानाचा व प्रतिष्ठेचा दर्जा व स्थान असते तो समाज सुसंस्कृत समजला जातो. भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रीची माता, भगीनी, पत्नी, कन्या अशी विविध रूपे असली तरी त्याच्या मुळाशी मनुने सांगीतलेले सुत्र आहे. 'न स्त्री स्वातंत्र्य अर्हती ! म्हणूनच स्त्री यापैकी कोणत्याही रूपामध्ये असली तरी तिला स्वातंत्र्य नाही. हजारो वर्षापासुन अस्तित्त्वात असलेल्या पुरूषसत्ताक पध्दतीमुळे स्त्रीवरील बंधने अधिकच घट्ट झाली आणि समाजाच्या दृष्टिकोणातुन स्त्री ही पुरूषाची दासी झाली. मनुस्मृतीत मनुने स्त्रीविषयी मत मांडताना असे म्हटले की,

*पिता रक्षति कौमार्ये भर्ता रक्षति योवने /*
*पुत्रो रक्षति वार्धक्ये न स्त्री स्वातंत्र अर्हती //*

वरील विधानाचा अर्थ असा की, स्त्रीचे रक्षण कुमार अवस्थेत पित्याने, तरूणपती पतीने तर म्हातारपणी पुत्राने करावे असे तो म्हणतो. म्हणजेच स्त्रीला कसलेच स्वातंत्र्य नाही. मनुने स्त्रीयांच्या स्वातंत्र्याला दिलेला नकार महिलांच्या हक्कांवरील घाला ठरला आहे. कारण मनुःस्मृतीप्रमाणे भारतीय स्त्रीयांना स्वातंत्र्याचा अधिकार नाही ही मानसिकता रूढ झाली. यामुळे स्त्रीचे मानवी हक्क नाकारले गेले. आणि तिला पशुतुल्य जीवन प्राप्त झाले. यातुनच समाजाच्या कोणत्याही रूढींचा, परंपरेचा बळी स्त्रीच पडू लागली. धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक बंधने केवळ स्त्रीच्या वाट्यालाच आली आणि व्यक्तिविकासाच्या तिच्या वाटा पुर्णपणे बंद झाल्या. बालविवाह सतीप्रथा, विधवा पुर्नविवाहास बंदी, केशवपण अशा विविध अमानुष व क्रूर प्रथा रूढ झाल्या होत्या. स्त्रीयांनी पडद्यातच रहावे, पुरूषाबरोबर येऊ नये, मोठ्याने हसू नये अशी बंधने स्त्रीयांवर होती. परंपरागत विचार, चाकोरीबध्द वागणूक पुर्वापार चालत आलेल्या कुटूंबरचनेत सामाजिक पथ्ये व नैतिकतेच्या कल्पना या सोयीस्करणे स्त्रीपुरत्याच मर्यादीत ठेवण्यात आल्या. स्त्रीला यामध्ये पुरती जखडुन ठेवण्यात आले. स्त्रीयांची एकीकडे आराधना व दुसरीकडे त्यांची प्रतारणा असा दुटप्पपणा भारतीय समाजाचे लक्षण बनले. लोकशाहीच्या स्विकारानंतरही स्त्रीयांना समानता आणि सामाजिक न्यायाची प्राप्ती होऊ शकली नाही. उलट परंपरागत सामाजिक नियमांच्या अधीन राहूनच तिला 'दुय्यम नागरिकच' मानले गेले. दुय्यमपणा व दुटप्पीपणा या चक्रव्युहात अडकलेल्या महिलांना हक्कांपासून सातत्याने दुरच ठेवले गेले. परंतु मानवी हक्कांच्या घोषनेनंतर जगात व भारतात महिलांच्या हक्कांसंबंधी जाणीव जागृती मोठ्या प्रमाणात वाढु लागली. महिलांच्या हक्कांसाठी सर्वच पातळीवर प्रयत्न करण्यात येऊ लागले. त्याचा परिणाम म्हणजे महिलांना व्यापक प्रमाणात अधिकार बहाल केले गेले.

**महिला हक्कासंबंधीची वैचारिक मांडणी व महिला चळवळ :**

जगातील पातळीवर महिला हक्कांची वैचारिक मांडणी करण्यासाठी जी आंदोलने व चळवळी झाल्या, त्या चहवळीतुनच स्त्रीवादाचा उदय झाला. आधुनिक काळात स्त्रीसक्षमीकरणाच्या प्रयत्नाचा एक भाग म्हणून स्त्रीवादाच्या अध्ययनाला सुरूवात झाली. 17 व्या शतकात युरोपमध्ये प्रथम स्त्रीयांच्या दुय्यम दर्जाबद्दल लिहीले गेले. स्त्रीया हीन आणि स्खलनशील असतात बुध्दीने हिणकस असतात असे देवाने म्हटले आहे. या धार्मिक वृत्तीला स्त्रीने आव्हान केले असे लर्नर यांनी म्हटले आहे. इंग्लंडमध्ये फर्ग्युसन या स्त्रीने धर्मनिरपेक्ष स्त्रीवादी निषेध चळवळ उभारली. स्त्रीवादाची मांडणी करणाऱ्या विचारवंत म्हणुन सिमॉन दि बोव्हा यांचा उल्लेख केला जातो. त्यांनी 'The Second Sex' या ग्रंथात स्त्रीयांचे मागासलेपण कशात आहे याचा शोध घेतला. त्या असे म्हणतात की, स्त्री ही स्त्री म्हणून जन्माला येत नाही, ती तशी घडवली जाते. तिच्या मागासलेपणाचे, शोषणाचे हेच

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 130 (II) | Feb. 2019 | UGC Approved No. 40705
The Role of Government to protect the Human Rights

कारण आहे. मेरी उलस्टोन क्रॉफ्ट ही स्त्रीवादी सिध्दांताची व्यवस्थित मांडणी करणारी पहिली स्त्री म्हणून ओळखली जाते. तीच्यावर फ्रेंच राज्यक्रांतीचा प्रभाव होता. 1792 मध्ये त्यांनी 'The vindication of the Rights of Woman' हा ग्रंथ लिहीला कोंडोरसेट या फ्रेंच लेखकानेही स्त्रीवाद उदारमतवादाचा अविभाज्य भाग आहे. स्त्रीयांना राजकीय अधिकार असावे, नागरिकत्वांत त्यांचा समावेश असावा असे विचार मांडले. जर्मन अभ्यासक हिंजेस यांनीही परंपरागत लिंगाधिष्ठीत श्रमविभागणीला नकार देऊन स्त्रीयांना शरीर रचनेच्या आधारे राजकीय अधिकार नाकारणे चूक आहे असे प्रतिपादन केले. ब्रिटीश विचारवंत जॉन स्टुअर्ट मिल यांनी 1869 मध्ये 'Subjection of Women' या ग्रंथात स्त्री-पुरूष समानतेवर भर देऊन स्त्री-पुरूष संबंध मैत्रीवर आधारित असावेत असा विचार व्यक्त केला. मार्गरेट फुल्लर यांनी 1845 'Woman in the Naneteenth Century' व्हर्जिनि उल्फ यांनी 'A Room of One's Own' या ग्रंथातुनही महिला हक्काच्या विचाराची मांडणी झाली आहे. स्त्रीयांची राष्ट्रीय पातळीवरील संघटना स्थापन करणारी बेरी फ्राइटन या अमेरिकन लेखिकेने कामाच्या ठिकाणी, राजकारणात आणि खाजगी जीवनात स्त्री-पुरूष समानता प्रस्थापित करणारे विचार मांडले. स्त्रीला एक सक्षम माणूस म्हणून जीवन जगण्याचा हक्क मिळाला पाहिजे यासाठी स्त्रीवादी चळवळीने सातत्याने प्रयत्न केले आहेत.

महिलांना हक्क मिळावेत यासाठी भारतातही सातत्याने वैचारिक मांडणी आणि चळवळी उभारण्यात आल्या आहेत. 'स्त्री नच अबला अन हीन' असे म्हणत अक्कमहादेवी यांनी स्त्री मुक्तीचा उद्‌घोष केला. भक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार करून मीराबाई यांनी धार्मिक क्षेत्रात स्त्री हक्कांचा पुरस्कार केला. 12 व्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी अनुभव मंटप या लोकसंसदेत 70 स्त्रीयांना प्रवेश दिला. लिंगायत धर्मात पुरूषांबरोबर स्त्रीयांना दिशा, विधी व मोक्ष याबाबतीत दिलेले समानाधिकार 12 हजार वेश्यांचे पुनर्वरतन करून सामाजिक, राजकीय व धार्मिक अधिकार प्रदान केले होते. राजा राममोहन रॉय यांनी सतीप्रथेच्या विरूध्द आवाज उठवला. रॉय यांच्या प्रयत्नामुळेच ब्रिटीश सरकारने इ.स. 1829 ला सतीबंदीचा कायदा संमत केला. पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी विधवा पुनर्विवाहाला चालना दिली. त्यांच्या पाठपुराव्यामुळे इ.स. 1853 ला ब्रिटीश सरकारने विधवा पुनर्विवाहाचे विधेयक संमत केले. महात्मा ज्योतीराव फुले यांनी महिलांना त्यांचे हक्क मिळवण्यासाठी शिक्षण हाच मार्ग असल्याचे मत मांडले. 1848 साली पुण्यातील भिड्याच्या वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली. न्या. महादेव गोविंद रानडे यांनीही सार्वजनिक सभेच्याद्वारे विवाहसंबंधीचे संमती वय निश्चित करण्यासाठी प्रयत्न केले. रमाबाई रानडे यांनी स्त्रीसभा, आर्य महिला मंडळ, हिंदू लेडिज सोशेल क्लब व पुण्यातील सेवासदन या संस्थामार्फत महिलांना त्याचे हक्क मिळवुन देण्याचे कार्य केले. महर्षी कर्वेनी 1893 मध्ये विधवा विवाह संघाची स्थापना केली. विधवांना शिक्षण व आश्रय मिळावा यासाठी 1896 मध्ये 'अनाथ बालिकाश्रम' स्थापन केला. विधवांच्या केशवपनास विरोध करून ती प्रथा बंद करण्यास कर्वेंचे योगदान मोलाचे आहे. 1882 साली ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री-पुरूष तुलना' नावाचा ग्रंथ लिहीला. हा ग्रंथ म्हणजे भारतीय महिला चळवळीचे बायबलच आहे. त्यांनी म्हटले की, 'जर बायकोला नवराच देव तर नवऱ्याची वागणूक देवाप्रमाणे पाहिजे.' पुरूषी वर्चस्वाच्या संस्कृतीला छेद देणारा हा ग्रंथ लिहुन स्त्रीवादी चळवळीला बळ दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही स्त्रीयांना गुलाम बनवणाऱ्या मनुस्मृतीचे दहन केले. भारतीय संविधानातही स्त्री-पुरूष समतेचा पुरस्कार केला. हिंदू स्त्रीयांना हक्क प्रदान करणारे 'हिंदू कोड बील' तयार केले. स्त्रीयांना समाजात समान दर्जा आणि चांगली वागणुक मिळाली पाहिजे असा विचार मांडला. समाजाचा विकास हा स्त्रीयांच्या विकासात समजला जावा, स्त्रीयांचा विकास हाच समाजाच्या विकासाची पुर्वअट आहे. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. एकंदरीत जगामध्ये व भारतामध्ये महिलांच्या हक्कांसाठी वैचारिक मांडणी व चळवळी सातत्याने झाल्या आहेत व आजही त्याचे स्वरूप व्यापक होताना दिसत आहे.

**महिला हक्कांसंबंधी भारतीय संविधानातील तरतुदी :**

भारतीय संविधानाने सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराचे तत्व स्वीकारले आहे. स्त्री-पुरषांनमध्ये लिंगभेद न करता समान पध्दतीने आणि एकदाच मताचा हक्क प्रदान केला आहे. 18 वर्षे पुर्ण झालेल्या प्रत्येक स्त्री-पुरूषाला मताचा समान हक्क देण्यात आला आहे. 'एक व्यक्ती एक मत एक मूल्य' हे सुत्र ठरवून स्त्रीयांनाही राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्यचा समान हक्क बहाल केला आहे. इंग्लंडमध्ये 1918 साली स्त्रियांना मतदानाचा हक्क प्राप्त झाला. स्विझर्लंडमध्ये 1973 साली व अमेरिकेतही मतदानाच्या हक्कासाठी बराच काळ संघर्ष करावा लागला. परंतु भारतीय स्त्रीयांना मतदानाच्या हक्कासाठी वेगळा संघर्ष करण्याची गरज पडली नाही. तसेच संविधानाच्या भाग -3 मध्ये मुलभूत हक्कांची तरतुद आहे. हे हक्क स्त्रीयांना पुरूषांच्या बरोबरीने समान प्रदान करण्यात आले आहेत. 14 ते 18 कलमामध्ये समतेचा हक्क देण्यात आला आहे. यामध्ये स्त्री-पुरूष कायद्यापुढे समान असतील. तसेच लिंगाच्या आधारावर भेदभाव केला जाणार नाही असे स्पष्ट करण्यात आले आहे. संविधानाच्या 4 थ्या भागात मार्गदर्शक तत्वांचा समावेश आहे. यामध्ये स्त्री-पुरूषांना समान कामासाठी वेतन, उपजीविकेची साधने मिळवण्याचा समान हक्क असेल असे नमुद करण्यात आले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेतही महिलांना 50% आरक्षण देण्यात आले आहे. यामुळे महिलांचा राजकीय सहभाग आज वाढला आहे.

**सारांश :**

पारंपारिक काळापासुन महिला हक्कांचे अध्ययन केल्यानंतर महिलांच्या वाट्याला आलेले दुय्यमत्व, अविकसितपणा, परावलंबित्व स्त्रीयांच्या मागासलेपणाचे कारण आहे हे लक्षात येते. यातुनच महिला सक्षमीकरणाचा विचार पुढे आला. स्त्रीयांच्या होणाऱ्या शोषणाला व अन्यायाला वाचा फोडण्यासाठी अनेक चहवळी पुढे आल्या. अनेक विचारकांच्या लेखनातून स्त्रियांच्या प्रश्नांची मांडणी केली गेली. भारतीय संविधानातही स्त्री-पुरूष समानता हे तत्व मान्य केले असले तरी महिलांना आपले मानवी हक्क उपभोगण्यात व माणूस म्हणून जगण्यात अनेक अडथळे निर्माण होतात. महिलांना समान वागणूक मिळावी तसेच छळ व अत्याचारापासुन आणि पिळवणुकीपासुन संरक्षण व्हावे यासाठी भारतात तसेच जागतिक पातळीवर सातत्याने प्रयत्न होत आहेत. त्याचे फलित म्हणून आज कांही प्रमाणात महिलांच्या हक्कांचे संरक्षण होत आहे.

**संदर्भ सुची :**

1) डॉ. राजशेखर सोलापुरे, मानवी हक्क आणि समाज, अरुणा प्रकाशन, लातूर, 2014
2) प्रा. सुरेश भालेराव, डॉ. प्रविण लोणारकर (संपा.), मानवी हक्क : सद्यस्थिती आणि आव्हाने, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, 2013
3) लेव्हिन लिआ, मानवी हक्क : प्रश्न आणि उत्तरे, नॅशनल बुक ट्रस्ट, नवी दिल्ली, 2009
4) पाटील व्ही.बी. मानवी हक्क, के. सागर पब्लिकेशन, पुणे, 2009
5) डॉ. राजशेखर सोलापुरे (संपा.), महिला विकास प्रश्न-पैलू-प्रयास, अरूणा प्रकाशन, लातूर, 2012

6) डॉ. दाते, डॉ. ढोबळे, प्रमुख राजकीय विचारप्रणाली, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपूरा, औरंगाबाद, 2018
7) प्रा.चि.ग. पांगरेकर, भारतीय राज्यघटना स्वरूप व राजकारण, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, 2012
8) श्रीवास्तव सुधारानी, श्रीवास्तव रागिनी, मानव अधिकार और महिला उत्पीडन, कॉमनवेल्थ पब्लिशर्स, नई दिल्ली, 2001
9) नाटाणी प्रकाश नारायण, मानवाधिकार और कर्तव्य, आवष्किार पब्लिशर्स, जयपूर, 2011